# महाराष्ट्र विधानसभा

**चौथे अधिवेशन, २०२२**

**सन २०२२-२३ च्या पुरवणी मागण्यांवरील**
**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**
**गुरुवार, दिनांक २२ डिसेंबर, २०२२**

## सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - ७**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एन-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२२५, अनुसूचित जाती अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग व अल्पसंख्यांक यांचे कल्याण**<br>**बाब क्रमांक: २४४, रूपये:- १,००,००,०००/-**<br>**श्री. अस्लम शेख** |
| (१) | ४५१४ | १० | रबाळे नवी मुंबई येथील बिटकॉन ऑफ इंडीया प्रायव्हेट लिमिटेड या इफ्रास्ट्रक्चर कंपनीच्या एमआयडीसीमधील प्लॉट क्र. ३१० मधील प्रोफॅब कंपनीच्या बाहेर असलेल्या तुंबलेल्या गटाराचे चेंबर साफ करण्यासाठी उतरलेल्या तीन कामगारांना रसायनाच्या उग्र वासाने विषारी गॅसची बाधा झाल्याने ३ कामगारांना एरोली येथील महानगरपालिकेच्या रूग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यापुर्वीच विजय झारखंड व संदीप हंबे या दोन कामगारांचा मृत्यू झाल्याची घटना, दिनांक ६ डिसेंबर, २०२२ रोजी उघडकीस येणे, तेथील कंपन्यातील रस्ते व गटार साफ करण्यासाठी कामगारांच्या सुरक्षितेच्या दृष्टीने आवश्य असलेली उपकरणे पुरविण्यात न आल्याने कंपनीच्या साइ; इंजिनिअरच्या निष्काळजीपणामुळे ही दुर्घटना घडल्याने गुन्हा दाखल करण्यात आलेला असणे, सदर प्रकरणामुळे प्रशासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, त्यामुळे नागरिकांमध्ये पसरलेला शासनप्रती असंतोष या गंभीर प्रकरणाची शासनाने तात्काळ चौकशी करून जबाबदार दोषींवर कारवाई करून मुत्यू पावलेल्या कमगारांच्या कुंटुंबाना तातडीने नुकसान भरपाईची आर्थिकि मदत करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एन-३**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण**<br>**बाब क्रमांक: २४७, रूपये:- ५६,०३,०००/-**<br>**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे)** |
| (२) | ४७२२ | १० | अमरावती जिल्हयातील अंध व्यक्तींसाठी कार्य करणाऱ्या अशासकीय संस्थामधील राज्य क्षेत्र कर्मचारी यांच्या वेतनवरील खर्च भागविण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्यात यावा, याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एन-४**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २४०३, पशुसंवर्धन**<br>**बाब क्रमांक: २५२, रूपये:- ४७,००,०००/-**<br>**ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे)** |
| (३) | ४७१४ | १० | लम्पीमुळे २४७८ जनावरांचा मृत्यू भरपाई केवळ १४१५ पशुपालकांना अमरावती जिल्ह्यात लम्पी चर्मरोगाच्या प्रकोपाने आतापर्यंत २४७८ पशुधनाचा बळी घेतला |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | आहे.परंतु प्रत्यक्षात एकूण १४१५ पशुपालकांनाच मदत मिळाली आहे.उर्वरीत पशुपालकांचे प्रस्ताव सादर केल्यानंतरही ते नुकसान भरपाईपासून अजूनही वंचित आहे.तर अमरावती जिल्ह्यात केवळ ५३ टक्के पशुपालकांना मदत मिळाली आहे.४७ टक्के लाभार्थ्यांना अद्यापही मिळालेली नाही.मिळणारी मदत प्रति जनावर हीसुद्धा आजच्या बाजार भावाने अत्यंत कमी असून वाढवून मिळणे आवश्यक आहे., यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: एन-४**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ४२२५, अनुचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग व अल्पसंख्यांक यांचे कल्याण यावरील भांडवली खर्च**<br>**बाब क्रमांक: २५९, रूपये:- १,०००/-**<br>**श्री. अजित पवार,श्री. छगन भुजबळ** |
| (४) | ४६५९ | १०० | ''सामाजिक न्याय विभागाच्या वसतीगृहांच्या संबंधित तक्रारींची चौकशी करण्यासाठी समाज कल्याण विभागाकडून अचानक वसतीगृहांना भेटी देऊन चौकशी करण्यात येत असणे, अचानक टाकलेल्या धाडीमुळे विद्यार्थ्यांच्या अडचणी लक्षात येत असणे, त्यामध्ये बहुतांश वसतिगृहांमध्ये गृहपाल नसणे, विद्यार्थी गायब असणे, पिण्याचे पाणी गरम पाण्याची व्यवस्था ग्रंथालय या सोयी सुविधा उपलब्ध नसल्याचे समोर येणे, सामाजिक न्याय विभागातर्फे मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी राज्यभरात ४४१ शासकीय वसतीगृहात ५७ हजार विद्यार्थी राहत असणे, याच्यासह अडीच हजार अनुदानित वसतिगृहात सव्वा लाख विद्यार्थी आणि ९० शाळांमध्ये साडेतेरा हजार विद्यार्थी राहत असणे शासन विद्यार्थ्यांच्या सोयी सुविधांसाठी कोट्यावधी रुपये खर्च करीत असताना वसतीगृहामध्ये विद्यार्थ्यांना योग्य त्या सोयी सुविधा मिळत नसणे, सहा महिन्यांपासून विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता मिळालेला नसणे शाळा महाविद्यालय सुरू होऊनही साहित्य न मिळणे, कोवीड काळामध्ये १९ महिन्यांचा निर्वाह भत्ता वसतीगृहातील विद्यार्थ्यांना मिळाला नसणे. तथापि, स्वाधार योजनेतील विद्यार्थ्यांना कोरोना काळातील भत्ता दिलेला असणे, सदरहू तफावत दूर करण्याची होत असलेली मागणी, तसेच विद्यार्थ्यांना योग्य त्या सोयी सुविधा देण्याबाबत राज्य शासनाने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना.'' |
| | | | **श्री. अस्लम शेख** |
| (५) | ४५०७ | १० | राज्यात विविध ठिकाणी मुलांचे व मुलींचे वसतीगृहांमध्ये विदयार्थ्यांसाठी सोयी सुविधा उपलब्ध नसणे, वस्तीगृहातील विद्यार्थ्यांकडे लक्ष दिले जात नसणे, विद्यार्थ्यांना 3 वर्षापासून शैक्षणिक साहित्य दिले जात नसणे, विद्यार्थ्यांना निर्वाह व भोजन भत्ता दिला नसणे, संबंधित विभागाचे अधिकारी दिरंगाई व वेळ काढूपणा करीत असणे, त्यामुळे हजारो विद्यार्थी शैक्षणिक सुविधा पासून वंचित राहत असणे, यासंदर्भात चेंबूर कृती समितीने व अध्यक्ष, नॅशनल स्टुडन्ट युनियन, मुंबई यांनी शासकीय मागणी केलेले असणे, तथापि शासनाने याकडे दुर्लक्ष केलेल्या असणे परिणामी विद्यार्थ्यांना पालकांमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोषाची भावना व शासनाप्रती निर्माण झालेली चिडेची भावना याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व तातडीने उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (६) | ४५४१ | १० | मुंबई, परभणी व लातूर जिल्हयात नविन वसतीगृह उभारण्याची आवश्यकता असणे, स्थानिक रहिवाशांनी सतत मागणी केली असणे, शासनाच्या धोरणानुसार वसतीगृहाचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व तातडीची उपाययोजना.<br>**पूरक मागणी क्रमांक: एन-४**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ४२२५, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग व अल्पसंख्याक यांचे कल्याण यावरील भांडवली खर्च**<br>**बाब क्रमांक: २६१, रूपये:- १,०००/-**<br>**श्री. ऋतुराज पाटील** |
| (७) | ४५५४ | १० | कोल्हापूर येथील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर सामाजिक भवनाचे बांधकाम दहा वर्षापूर्वी करण्यात आले असून मात्र समाजिक भवनाची सध्या नादुरुस्त अवस्था पाहता दुरुस्ती करणे अत्यंत आवश्यक असणे, २५० क्षमतेचा सांस्कृतिक हॉल हा पूर्णपणे नादुरुस्त असलेले कुठल्याही कार्यक्रमासाठी उपयोगात नसणे, कार्यालय व तत्सम इतर बांधकामे संपूर्णपणे दुरुस्त करण्याच्या योग्यतेची असणे. सदर दुरुस्तीच्या दृष्टीने नागरिकांनी देखील या करिता आंदोलने करणे,सर्व क्षेत्रातून दुरुस्तीची मागणी असल्याने सामाजिक भावनाचा विचार करता सदर दुरुस्तीसाठी किमान चार कोटी निधी उपलग्ध करुन देण्यात येणे, गरजेचे असणे, सदर दुरुस्ती करण्याकरिता बाबतचा प्रस्ताव संबंधित विभागाने म्हणजे समाज कल्याण अधिकारी कोल्हापूर यांच्या कडून मंजुरी करिता शासनाकडे पाठविलेला असणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, सदर डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक भवन दुरुस्ती करिता चार कोटी निधी उपलब्ध व्हावा यासाठी करावयाची उपाययोजना व करावयाची कार्यवाही. |

---

**विधान भवन**
**नागपूर,**
**दिनांक : ३० डिसेंबर, २०२२**

**श्री.राजेन्द्र भागवत,**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग (१० प्रती)
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर